www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

● LOKRAKSHANAY ● RNI TC NO. MAHBIL10469

●Editor- Rakesh Shankar Gore ●Daily ●Thane ●Volume-01, Issue-206 ● Saturday, 30 December 2023 ●Pages-04 ●Rs.2/-

**अनमोल विचार**

"यशासाठी कोणतीही वेळीसाठी थांबू नका! त्याऐवजी आपला सर्व वेळ खास बनवा !! "

## लक्षवेधी

### 'महर्षि वाल्मीकि अयोध्या धाम' असे असणार अयोध्येतील विमानतळाचे नाव

**अयोध्या :** येथे बांधण्यात आलेल्या श्रीराम आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव पालटण्यात आले आहे. 'महर्षि वाल्मीकि आंतरराष्ट्रीय विमानतळ अयोध्या धाम' असे त्याचे नामकरण करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, ३० डिसेंबर या दिवशी अयोध्येत जाऊन या विमानतळाचे उद्घाटन करणार आहेत. याखेरीज अयोध्येच्या पुनर्विकसित रेल्वे स्थानकाचेही पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान मोदी या वेळी नवीन 'अमृत भारत' आणि 'वन्दे भारत' रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवतील. ते राज्यातील १५ सहस्र ७०० कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करतील.

### नितीन गडकरी यांनी ११७०.१६ कोटी रुपयांच्या या २९ रस्ते प्रकल्पांना दिली मंजुरी

**नवी दिल्ली :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांनी लडाख या केंद्रशासित प्रदेशात राज्य महामार्ग, प्रमुख आणि इतर जिल्हा रस्तेमार्गांचा समावेश असलेल्या २९ रस्ते प्रकल्पांसाठी ११७०.१६ कोटी रुपयांच्या निधी वाटपाला मंजुरी दिली आहे. आपल्या एक्स पोस्टमध्ये श्री गडकरी म्हणाले की, २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी राष्ट्रीय महामार्ग आणि केंद्रीय रस्तेमार्ग आणि पायाभूत सुविधा निधी(CRIF) या अंतर्गत ८ पुलांसाठी एकूण १८१.७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

### श्रीराममंदिरात लावणार ६०० किलो वजनाची घंटा!

**नवी दिल्ली :** अयोध्येतील श्रीराममंदिराच्या सोहळ्याच्या निमित्ताने श्रीराममंदिरात तब्बल ६०० किलो वजनाची घंटा लावण्यात येणार आहे. ही घंटा अष्टधातूंनी बनवण्यात आली आहे. यावर मोठ्या अक्षरांत 'जय श्रीराम' असे लिहिलेले आहे. उत्तरप्रदेशमधील जलेसर येथील एका कुटुंबाने या विशाल घंटेची निर्मिती केली आहे. ही घंटा बनवण्यासाठी शेकडो कामगारांनी सहकार्य केले आहे. इतर मंदिरात बसवण्यात येणाऱ्या विशालकाय घंटा या ३-३ भाग जोडून लावल्या जातात; मात्र श्रीराममंदिरासाठी बनवण्यात आलेली घंटा एकाच भागात बनवण्यात आलेली असून ती अखंड आहे. घंटेचा खालच्या बाजूचा वर्तुळाकार घेरा १५ फूट एवढा आहे, तर उंची ८ फूट इतकी आहे.

### 'विमानतळांवरील धुक्याच्या समस्येवर उपाययोजना करू' - ज्योतिरादित्य शिंदे

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून दिल्ली विमानतळावर दाट धुक्यामुळे विमान वाहतूक विस्कळीत होत आहे. त्यामुळे अनेक विमानांना दुसरीकडे वळवावे लागते. आजही असाच प्रकार झाला. त्यामुळे विमान वाहतूक विस्कळीत झाली आहे. या संबंधात नागरी विमान वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी शुक्रवारी सांगितले की आमचे मंत्रालय विमानतळ अधिकारी आणि विमान कंपन्यांशी समन्वय साधत आहे आणि या समस्येला सामोरे जाण्यासाठी उपाययोजना करत आहे. धुक्याच्या समस्येला तात्पुरती समस्या असे संबोधून दिलेल्या मुलाखतीत ज्योतिरादित्य म्हणाले की धुक्याच्या घनतेच्या बाबतीत यावर्षी परिस्थिती थोडी अभूतपूर्व आहे. ते म्हणाले की, धुक्याची समस्या ही एक समस्या अशी आहे की जी आम्हाला दरवर्षी १५-२० दिवस भेडसावते.

### लोकसभेच्या आचारसंहितेआधीच भाजपा उमेदवार जाहीर करणार

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेचे वेध सर्वांना लागले आहेत. फेब्रुवारीमध्ये निवडणूक आयोग याची घोषणा करण्याची शक्यता आहे. यातच अयोध्येत राममंदिराची प्रतिष्ठापना करणार असल्याने देशभरात भाजपाला पोषक वातावरण निर्माण होणार आहे. याचाच फायदा भाजपाने घेण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत. केंद्रीय नेत्यांकडून सूचना येताच भाजपाने प्रत्येक मतदारसंघांत निवडणुकीची तयारी सुरु करण्यास सुरुवात केली आहे. उमेदवारांची यादी जाहीर करण्यासाठी आचार संहितेची वाट न पाहता त्यापूर्वीच यादी जाहीर केली जाणार असल्याचे संकेत युपीतील भाजपा नेत्यांनी दिले आहेत.

### राघव चड्ढा यांची राज्यसभेतील नेतेपदी नियुक्ती करण्याची AAPची विनंती फेटाळली

**नवी दिल्ली :** राघव चड्ढा यांची संसदेच्या वरिष्ठ सभागृहात पक्षाचे अंतरिम नेते म्हणून नियुक्ती करण्याची आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांची विनंती राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळून लावली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, धनखर यांनी केजरीवाल यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'हा पैलू 'द लीडर्स अँड चीफ व्हीप्स ऑफ रेकग्नाइज्ड पार्टीज अँड ग्रुप्स इन संसद (सुविधा) कायदा, 1998' आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांच्या अधीन आहे. विनंती स्वीकारले जात नाही'. या महिन्याच्या सुरुवातीला केजरीवाल यांनी धनखड यांना चड्ढा यांना राज्यसभेत आपचे अंतरिम नेते म्हणून नियुक्त करण्यासाठी विनंती अर्ज दिला होता.

### मोदी सरकारचे आणखी मोठे यश, ULFA सोबत करणार शांतता करार

**नवी दिल्ली :** मोदी सरकारला आणखी एक मोठे यश मिळताना दिसत आहे. कारण केंद्र सरकार आणि आसाम सरकार 29 डिसेंबर रोजी युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (ULFA) सोबत शांतता करार करणार आहेत. ईशान्येकडील शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने हे एक मोठे पाऊल असल्याचे बोलले जात आहे. या करारादरम्यान गृहमंत्री अमित शहा, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा आणि अल्फा सपोर्टचे अनेक बडे नेते सहभागी होणार आहेत. यादरम्यान शांतता करारावर स्वाक्षरी केली जाईल. या बैठकीत इंटेलिजेंस ब्युरोचे संचालक तपन डेका आणि ईशान्य बाबींचे सरकारी सल्लागार ए के मिश्रा हेही उपस्थित राहणार आहेत.

# पुढचे 15 दिवस सतर्कतेचे; राज्यातील आरोग्य मंत्र्यांचा इशारा

# नववर्षाच्या पूर्वसंध्येसाठी १३ हजार ५०० पोलिसांच्या फौजफाटयासह मंबई पोलीस सज्ज



**■मुंबई। यश सावंत,**

नव्या वर्षाचं स्वागत आणि 2023 या वर्षाला अनोख्या अंदाजात निरोप देण्यासाठी म्हणून सर्वांचीच लगबग सुरु आहे. सलग आलेल्या सुट्ट्यांमुळं अनेकांनीच भटकंतीचे बेत आखले आहेत. पर्यटनस्थळं, गिरीस्थानं, वस्तूसंग्रहालयं, ऐतिहासिक वास्तू, खरेदीची ठिकाणं अशा एक ना अनेक ठिकाणांवर होणारी गर्दी आता वाढू लागली आहे. काही पर्यटनस्थळांवर तर क्षमतेहून दुपटीनं गर्दी झाली आहे. पण, या परिस्थितीमध्ये एका संकटाचं सावट असून, याकडे दुर्लक्ष झाल्यास हेच संकट जीवावर बेतू शकण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. हे संकट आहे कोरोनाचं. गेल्या काही दिवसांपासून एकिकडे कोरोनाचा नवा विषाणू आणि कोरोना संसर्ग फोफावण्याचं वृत्त असतानाच दुसरीकडे मात्र नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटन व धार्मिक स्थळांवर गर्दी होताना दिसत आहे. अनेक ठिकाणी नागरिकांकडून कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचा विसर पडल्यामुळं त्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही आहे. त्यातच राज्यात सर्वसामान्य ताप, फ्लूची साथही असल्यामुळं अनेकांनाच ही समस्या भेडसावच आहे. पण, हा बेजबाबदारपणा इतरांनाही धोका पोहोचवू शकतो कारण ही वाढती गर्दी आणि नियमांची पायमल्ली पाहता करोनाच्या नव्या विषाणूचा संसर्ग वाढण्याचा धोका अधिक संभवतो. राज्यातील हे एकंदर चित्र पाहता पुढील किमान 10 - 15 दिवस आरोग्य यंत्रणेनेसोबतच नागरिकांनी सतर्क रहावें, असं इशारावजा आवाहन राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी केले आहे. सध्या राज्यात करोनाच्या 'जेएन.1' या नव्या व्हेरिएंटचे रुग्ण आढळत असल्यामुळं कोरोना टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली असून एक महत्त्वाची बैठक नुकतीच पार पडली. ज्यामध्ये राज्यातील कोरोनाची सद्यस्थिती आणि आरोग्य विभागाच्या तयारी संदर्भात चर्चा झाली.

**■ काय म्हणाले टास्क फोर्सचे अध्यक्ष?**

राज्याच्या कोरोना टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. गंगाखेडकर यांनी बैठकीसंदभार्तील माहिती देत नवा व्हेरिएंट मोठा धोका निर्माण करेल अशी परिस्थिती सध्या नसली तरीही वयोवृद्ध आणि गंभीर आजाराच्या रुग्णांनी काळजी घेण्याची आवश्यकता असल्याचं स्पष्ट केलं. राज्याची आरोग्य यंत्रणा सज्ज असून नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घेण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**छेडछाडीवर विशेष लक्ष, मद्यपी चालकांवर वाहतूक पोलिसांची करडी नजर असणार..**

सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अबाल-वृद्धांसह तरूणाई सज्ज झाली असतानाच, यादरम्यान कोणताही अनुचित पकार घडू नये यासाठी मुंबई पोलीस शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवणार आहेत. मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणांवर १३ हजार ५०० पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. त्याशिवाय वाहतूक पोलीस कर्मचारी, राज्य राखीव दल आणि शीघ्रकृती दलाचे जवान तैनात करण्यात येणार आहेत. नागरीकांना नववर्ष आगमन सुरक्षितपणे व निर्विघ्नपणे साजरा करता यावा याकरीता मुंबई पोलीस दलाकडून २२ पोलीस उप आयुक्त, ४५ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह २०५१ पोलीस अधिकारी व ११ हजार ५०० पोलीस अंमलदार बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत.

## 'सत्ता उलथवण्यासाठीच मी इथे उभा.'; उद्धव ठाकरेंचा शिंदे गटावर हल्लाबोल



**■मुंबई। अनिकेत भंकाळ,**

सत्ता उलथवण्यासाठीच मी इथे उभा आहे असे विधान ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले आहे. तसेच सत्तेला घाबरणार असाल तर काही उपयोग नाही. भीती वाटणारी सत्ता उलथवलीच पाहिजे असा हल्लाबोलही त्यांनी केला आहे. ते कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. पाचोरा विधानसभा मतदारसंघातील शिंदे गट आणि भाजपमधील काही पदाधिकाऱ्यांनी आज मातोश्रीवर उद्धव ठाकरेंच्या पक्षात प्रवेश केला. यावेळी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे देखील उपस्थित होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच येणारे नवीन वर्ष हे देशासाठी लोकशाहीचे जावो, असे उद्धव ठाकरे म्हणाले. शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या सर्वांचे मी स्वागत करतो. वैशाली ताई यांचे कौतुक वाटत आहे. आर. ओ पाटील आमचा भक्कम माणूस होता. त्यांचे जाणे एक आघात होता. पण त्यांचा वारसा वैशाली ताई पुढे नेत आहेत, असे म्हणत ठाकरे गटाच्या स्थानिक नेत्या वैशाली सूर्यवंशी यांचे कौतुक केले आहे. वैशाली सूर्यवंशी यांच्या प्रयत्नामुळे ठाकरे गटात पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश झाला, असेही ते म्हणाले. या पक्षप्रवेशाच्या वेळी संजय राऊत हे देखील उपस्थित होते. ते म्हणाले, आपल्याकडे पक्ष नाही. चिन्ह नाही. तरी लोक पक्ष प्रवेश करत आहेत. हाच वारसा वैशाली पाटील पुढे नेत आहेत. उद्धव ठाकरेंचे बळ वाढवत आहे. शिवसेना सत्तेला लाथ मारत पुढे जात आहे.

**कोण आहेत वैशाली सूर्यवंशी ?**

पाचोरा विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य, सभापती, माजी सरपंच दिवंगत आमदार आर ओ पाटील यांच्या वैशाली सूर्यवंशी कन्या आहेत.

## नौदल अधिकाऱ्यांच्या खांद्यावर झळकणार शिवरायांच्या राजमुद्रेचं चिन्ह

**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**

नौसेना दिनाच्या निमित्ताने हिंदुस्थानी नौदलात काही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. त्याची घोषणा यापूर्वीच नौदल दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. आता त्याची अंमलबजावणी होणार आहे. नौदलाच्या ॲडमिरल्सच्या खांद्यावर हिंदुस्थानी पद्धतीचे एपॉलेट्स लागणार आहेत. त्यावर नौदलाच्या ध्वजाप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुद्रेचं अष्टकोनी चिन्ह असणार आहे. शुक्रवारी या एपॉलेट्सचं अनावरण करण्यात आलं. त्यावर सगळ्यात वरच्या बाजूला सोनेरी बटन असेल. त्यावरही नौदलाचं चिन्हं कोरलेलं असणार आहे. त्याखाली शिवरायांच्या राजमुद्रेचा अष्टकोन आणि त्यात देशाची राजमुद्रा असेल. त्या खालोखाल तलवार आणि संगिनी एकमेकांवर क्रॉस रुपात दिसतील. तर त्याखाली सदर अधिकाऱ्याला मिळालेले स्टार्स लावले जाणार आहेत. 2023च्या नौदल दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या बदलाची घोषणा केली होती.





## 'जनतेच्या मनातील आक्रोश भाजपला सत्तेवरून खाली खेचेल' - डॉ. अमोल कोल्हे



**■पुणे। अभिजीत येरल्लू,**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी महाविकास आघाडीच्या वतीने 'शेतकरी आक्रोश मोर्चा'चे आयोजन करण्यात आले असून दि. २७ रोजी जुन्नर शिवनेरी येथून आक्रोश मोर्चाला सुरुवात झाली. राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघत आहे. शिरूर तालुक्यात या यात्रेचे आगमन होताना त्याची सुरुवात वढू येथे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन करण्यात आली. स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधत शिक्रापूर येथे या यात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार डॉ. अमोल कोल्हे स्वतः ट्रॅक्टर चालवत होते. यावेळी माध्यमांशी बोलताना अमोल कोल्हे म्हणाले की, केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांचे जीवन उद्धवस्त झाले असून, त्याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठीच या आक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. जनतेच्या मनातील हा आक्रोश येत्या लोकसभा निवडणुकीत भाजपला सत्तेवरून खाली खेचल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिला. तर यावेळी आमदार अशोक पवार म्हणाले, केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी ताबडतोब उठवावी, खासगी व सरकारी असा भेदभाव न करता दूध उत्पादकांना अनुदान मिळावे, बिबट्याप्रवण क्षेत्रात शेतीला दिवसा अखंड वीजपुरवठा करावा, पीकविमा ताबडतोब मिळावा, सरसकट कर्जमाफी देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक कर्जासाठी धोरण राबवावे, अशा मागण्या अशोक पवार यांनी केल्या.

## संपूर्ण वर्षभर प्रशासकांची राजवट... निवडणूकीच्या प्रतिक्षेत सरत्या वर्षाला निरोप

**■मुंबई। विशाल कारंडे,**

वर्ष २०२३ संपण्यास अवघा एक दिवस शिल्लक असून हे वर्ष मुंबई महापालिकेसाठी विशेष ठरले. संपूर्ण वर्षभर महापालिकेवर प्रशासकांची राजवट होती. निवडणूक कधी होईल याच्या प्रतिक्षेतच सरत्या वर्षाला पालिका वर्तुळातही निरोप दिला जाणार आहे. केंद्रीय पथकांच्या चौकशीचा ससेमिरा, नवीन मोठ्या प्रकल्पांच्या घोषणा यामुळे मुंबई महापालिकेसाठी हे वर्ष चांगलेच गाजले. मुंबई महानगरपालिकेची मुदत मार्च २०२२ ला संपली तेव्हापासून मुंबई महापालिकेवर प्रशासकांची राजवट सुरू आहे. पालिकेची निवडणूक २०२२ मध्ये लागणे अपेक्षित होते, निवडणूक कधीही लागू शकेल अशी





अपेक्षा असताना हे वर्षही सरले. त्यामुळे २०२३ हे संपूर्ण वर्ष प्रशासकाची राजवट सुरू आहे. यावर्षी फेब्रुवारीत अर्थसंकल्पही प्रशासकांनी म्हणजेच पालिका आयुक्तांनीच सादर केला होता. हे वर्ष अनेक अर्थांनी पालिकेसाठी विशेष ठरले. करोनाकाळात मुंबई महापालिकेने केलेल्या खर्चात मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचा आरोप करीत भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी ठाकरे यांच्यावर आरोप केले आहेत. या आरोपांमुळे मुंबई महापालिकेतील अधिकाऱ्यांचीही चौकशी सुरू आहे. राजकीय शह काटशह यांच्या लढाईत पालिकेचे अधिकारीही कचाट्यात सापडले असून वर्षभरात अनेक लहानमोठ्या अधिकाऱ्यांची चौकशी सुरू आहे. त्यामुळे मुंबई महापालिका यावर्षी वेगळ्या अर्थाने चर्चेत राहिली. पालिकेवर प्रशासकांची राजवट असल्यामुळे आयुक्तांच्या आडून राज्य सरकारचा पालिकेच्या कारभारावर हस्तक्षेप यावर्षी वाढला. शहरचे पालकमंत्री दिपक केसरकर आणि उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांना पालिका मुख्यालयात कार्यालय दिल्यामुळे राज्य सरकारचा थेट अंमल पालिकेच्या कारभारात याच वर्षी सुरू झाला व एक नवीनच प्रथाही सुरू झाली.

## देवेंद्र फडणवीसांना एक मेसेज अन् नेपाळमध्ये अडकलेले ५८ भाविक महाराष्ट्रात सुखरूप परतले



**■मुंबई। विशाल पाटील,**

नेपाळमध्ये देवदर्शनासाठी गेलेले महाराष्ट्रातील तब्बल ५८ भाविक पर्यटन कंपनीच्या भोंगळकारभारामुळे नेपाळमध्ये अडकून पडले होते. संपत आलेले खिशातील पैसे आणि पर्यटन कंपनीने हात वर करत नेपाळमध्येच अडकवून ठेवल्याने त्यांना सुटकेचा मार्ग दिसत नव्हता. या भाविकांनी मदतीसाठी अनेकांना फोन लावले मात्र त्याचाही उपयोग होत नव्हता. यादरम्यान या पर्यटकांबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका मेसेजद्वारे माहिती मिळाली. त्यानंतर मात्र वेगाने सूत्रं फिरून हे भाविक नेपाळमधून सुखरूपपणे उत्तर प्रदेशात आणि तिथू महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील आपल्या गावांमध्ये पोहोचले. या प्रसंगातून सुटका झाल्यानंतर भाविकांनी देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. नेपाळमध्ये अडकलेल्या भाविकांपैकी एक असलेल्या संजू म्हात्रे यांनी सांगितले की, आम्ही रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील कामोठे गावातील ५८ जण नेपाळमध्ये धार्मिक पर्यटनासाठी गेले होते. यामध्ये ३५ महिला आणि २३ पुरुषांचा समावेश होता. गोरखपूरहून नेपाळपर्यंत आम्ही व्यवस्थित पोहोचलो. तेथील लुंबीनी, पोखरा, जनकपुरी, मनोकामना येथील मंदिरांचं दर्शन घेतलं. मात्र, काठमांडूला आल्यावर आम्हाला राधाकृष्ण ट्रॅव्हल्सच्या एका बसमध्ये कोंबण्यात आलं. आम्ही गावाहून निघतानाच सर्व पैसे भरलेले होते.

## मराठा VS ओबीसी संघर्ष पेटणार!

### ओबीसी आणि मराठा समाज एकाच दिवशी मुंबईच्या मैदानात उतरणार



**■मुंबई। दिगंबर जाधव,**

मुंबईत 20 जानेवारीला मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात मराठा समाजाच्या आंदोलनाची हाक देण्यात आलेली आहे. तर दुसरीकडे ओबीसी जनमोर्चाने ही आपल्या विविध मागण्यांसाठी 20 जानेवारीलाच आंदोलन पुकारलंय. या दोन्ही समाजाच्या आंदोलनाची तयारी सध्या मुंबईत जोरदार सुरूये. मात्र मुंबईत एकाच वेळी दोन्ही समाज - आमने सामने येऊन संघर्ष पेटण्याची शक्यता आहे. पण यामध्ये मुंबई पोलीस कोणाच्या सभेला परवानगी देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा काही थांबता थांबेना. त्यात आता मराठ्यांना ओबीसी मधून सरसकट प्रमाणपत्र मिळावं या प्रमुख मागणीसाठी मनोज जरांगे यांनी 20 जानेवारीपासून आंदोलनाची हाक दिलीये. 20 जानेवारी पासून सुरु होणारे हे आंदोलन पुढे मुंबईत एकत्र होणार आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांचा शिष्टमंडळ,सकल मराठा समाज आणि संघटना यांच्याकडून सध्या मुंबईत तयारी करण्याच काम सुरू आहे.

## दहिसर मधील मुरबाळी तलावाच्या दुरूस्तीसाठी ठाकरे गटाची निदर्शने



**■मुंबई। भावना जैन,**

दहिसर पूर्वेकडे असलेल्या पालिकेच्या मुरबाळी जलतरण तलावाची दुर्दशा झाली असून या तलावाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी यासाठी शिवसेनेच्या ठाकरे गटाने शुक्रवारी निदर्शने केली. तलावाच्या दुरुस्तीसाठी अनेकदा मागणी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकांनी आंदोलन केले. दहिसर पूर्वेकडे शुक्ला कपाऊंडमध्ये असलेल्या मुरबाळीदेवी जलतरण तलावाची गेल्या अकरा वर्षातच दुर्दशा झाली आहे. हा तलाव २०१२ मध्ये नागरिकांसाठी खुला करण्यात आला होता. मात्र सध्या या तलावाची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. याबाबत शिवसेनेचे माजी नगरसेवक संजय घाडी यांनी सांगितले की जलतरण तलावाच्या प्रवेशद्वारावरील नावाचे फलकही पडले आहेत. तलावाच्या आजूबाजूच्या लाद्याही उखडल्या आहेत. तलावाच्या आतील भागातील लाद्यांचे अक्षरशः तुकडे पडले असून ते तलावात पोहोण्यासाठी उतरलेल्यांच्या पायाला लागतात.

## मी सर्पमित्र असून माझी तक्रार केली तर तुझा खेळ खल्लास...

**■पिंपरी।सचिन कदम,**

रूग्णवाहिकेत बसलेल्या महिला डॉक्टरशी गैरवर्तणूक करत तिचा विनयभंग केल्याप्रकरणी रूग्णवाहिका चालकासह मदतनीसावर आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ३० नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२३ या कालावधीत आळंदी येथे घडला. मदतनीस गोरखनाथ दराडे (वय ४०) व चालक शिवप्रसाद ससाणे (वय ४१) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३८ वर्षीय डॉक्टर महिलेने आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फियार्दी या तातडीच्या सेवेसाठी उपलब्ध असलेल्या १०८ क्रमांकाच्या रूग्णवाहिकेत





नोकरी करतात. ३० नोव्हेंबर रोजी चालकाशेजारील आसनावर बसल्या असताना गोरखनाथ याने महिलेसोबत अश्लील वर्तन करत अश्लील शेरेबाजी केली. शिवप्रसाद यानेही १० डिसेंबर रोजी रूग्णवाहिकेत डॉक्टर महिलेशी गैरवर्तन केले. तसेच, त्यांना शिवीगाळ करत मी सर्पमित्र असून माझी तक्रार केली तर तुझा खेळ खल्लास करीन अशी धमकी दिली. या दोन्ही प्रकारानंतर महिला डॉक्टरने आळंदी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

# शैक्षणिक संशोधनाला गती गरजेची



**को**रोनाचे आव्हान मोठे होते. त्याचा विपरित परिणाम शिक्षण क्षेत्रावरही झाला. शिक्षण प्रक्रियेतील अनेक प्रश्नही समोर आले. हे लक्षात घेता शिक्षणाच्या क्षेत्रात संशोधनाला गती देणे विद्यार्थिहितासाठी अगत्याचे आहे. कोरोना महासाथीनंतरच्या काळात शैक्षणिक संशोधनास चालना मिळणे गरजेचे होते. पण तसे होताना दिसत नाही. यावर विचार करण्याची आज गरज आहे. तसे पाहता शैक्षणिक संशोधनाची प्रक्रिया ही फार गुंतागुंतीची नाही. ती सरळ आणि सोपी आहे, हे आपण ध्यानात घेणे गरजेचे आहे.

समाजातील कोणत्याही समस्येची निवड करणे, त्या समस्येसंदर्भातील परीकल्पनेची संरचना करणे, संबंत समस्येची माहिती संकलित करणे, समस्येसंदर्भात प्राप्त महत्त्वपूर्ण निष्कषार्चा अहवाल तयार करणे, संशोधन समस्या शोधणे आणि त्या संदर्भातील विविध विषयांच्या अभ्यासाची पद्धत शोधणे, माहितीचे संयोजन व अर्थनिर्वचन, निष्कषार्चा अहवाल व्यवस्थित मांडणे या सर्व मुद्द्यांना शैक्षणिक संशोधन प्रक्रियेत महत्वाचे स्थान असल्याचे शिक्षणविषयक अभ्यासक अनंत जोशी यांनी या पूर्वीच नमूद केले आहे.

या सर्वांचा वर्तमानात पुन्हा नव्याने विचार होण्याची आवश्यकता आहे. कोरोनानंतरच्या काळातील शैक्षणिक विश्व बदलल्याचे चित्र दिसत आहे. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे संपूर्ण भावविश्व, त्यांची मानसिकता, त्यांना प्राप्त होणारी शैक्षणिक साधनसामग्री या सर्वांचा पुन्हा नव्याने अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे. शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक असणारे विविध स्त्रोत शोधणे अर्थात सांस्कृतिक स्त्रोत, सादृश्य स्त्रोत, वैज्ञानिक स्त्रोत, सैद्धांतिक स्त्रोत, संशोधकांचे व्यक्तिगत ज्ञान आणि अनुभव यांचा पुन्हा नव्याने समन्वय साधल्यास शैक्षणिक संशोधन विकास प्रक्रिया गतिशील होण्यासंबंधीचा सकारात्मक विचार बळकट होईल, यात शंका नाही.

डिजिटल शैक्षणिक साहित्य

डिक्शनरी ऑफ एज्युकेशन या ग्रंथानुसार शैक्षणिक क्षेत्रात किंवा शैक्षणिक समस्यांशी निगडित अभ्यास व अन्वेषण यास शैक्षणिक संशोधन म्हटले आहे. याचा अर्थ असा होतो की, शिक्षण क्षेत्रातील उद्दिष्ट्ये, अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापनपद्धती, मूल्यमापन, विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक साहित्य, तंत्र, पाठ्यपुस्तके इत्यादींपैकी एक वा अनेक शैक्षणिक घटकांच्या संदर्भात निर्माण झालेल्या अथवा होणाऱ्या समस्यांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने उत्तर शोधण्याचा केलेला वा करण्यात येणारा प्रयत्न म्हणजे शैक्षणिक संशोधन असे अभ्यासक मौली यांनी केलेली मांडणी महत्त्वाची वाटते.

कोरोना नंतर या प्रक्रियेत शिथिलता आल्याचे प्रकर्षाने अनुभवायाला येते. डिजिटल शैक्षणिक साहित्य निर्माण प्रक्रिया वाढली, पण ती प्रयोगात आणण्यात आपण कमी पडत आहोत, याचा विचार होणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागातील शैक्षणिक वातावरणाचा नव्याने अभ्यास करून शैक्षणिक संशोधन विषयाची व्याप्ती वाढवण्याची गरज आहे.

शिक्षण विषयक संशोधनाला चालना मिळावी म्हणून शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील कोरोना नंतरच्या शैक्षणिक पारिस्थितीचा विस्तृत अभ्यास होणे गरजेचे वाटते. ग्रामीण भागातील शाळा, विशेषतः जिल्हा परिषद चालवत असलेल्या मराठी शाळा व त्यांची शैक्षणिक पारिस्थिती चिंता वाढवणारी आहे, हे आपणांस मान्य करावे लागेल.

संस्थात्मक स्तरावरील कार्य

संस्थात्मक स्तरावर १९१७ पासून सुरू झालेली शैक्षणिक संशोधन प्रक्रिया पुढे विविध संस्थांच्या माध्यमातून आजही सुरू आहे. सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, सेंट्रल ब्यूरो ऑफ टेक्स्टबुक रिसर्च, नॅशनल फंडामेन्टल एज्युकेशन सेंटर, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑडिओ व्ह्युज्युअल एज्युकेशन, नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (एनसीईआरटी), इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (आयसीएसआर) आणि नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन या संस्थांचा उल्लेख करावा लागेल. शिक्षणविषयक संशोधनाला या संस्थांनी आपापल्या कक्षेत भरीव योगदान दिले आहे. शैक्षणिक संशोधनास चालना देण्यासाठी कोठारी आयोगानेही विशेष प्रयत्न केले, हे मान्य करावे लागेल.

डॉ. एम. बी. बुच यांचा शिक्षणातील संशोधनाचे सर्वेक्षण हा ग्रंथ आजही महत्त्वाचा वाटतो. या ग्रंथाची कोरोना नंतरच्या शैक्षणिक वातावरणाचा अभ्यास करण्यास निश्चित मदत होईल. शहरी व ग्रामीण भागातील शैक्षणिक अर्थशास्त्र समजावून घेण्यात आजही आपण अपयशी ठरत आहोत. वर्तमानाचा विचार करता अनेक मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शाळाबाह्य विद्यार्थी व त्यांचे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे तसेच आहेत. एक-दोन योजना येतात पण त्या फारसा प्रभाव टाकत नाहीत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.



# SUPERFOOD EGG : KNOW THESE 5 BENEFITS OF ANDA

**F**or centuries, the humble egg has been a breakfast staple, a culinary chameleon, and a source of protein for people around the world. But beyond its familiar sunny-side-up form, the egg holds a treasure trove of nutrients that earn it the title of a "superfood." In India, where the egg is lovingly called "anda," its benefits extend far beyond a delicious omelette. Here are 5 remarkable health benefits associated with the consumption of eggs. Protein prowess: Eggs are renowned for their exceptional protein content. With all the essential amino acids needed for bodily functions, they stand out as a complete protein source. One whole egg provides nearly 25% of your daily protein requirement. Proteins play a crucial role in tissue repair, muscle building, and the overall maintenance of a healthy body. A bounty of vitamins and minerals: Beyond protein, eggs are a rich source of essential vitamins and minerals. Vitamin A, vital for skin health; vitamin B12, crucial for nerve function; vitamin D, supporting bone health; iron, necessary for oxygen transport; and selenium, an antioxidant, collectively contribute to a robust immune system and overall healthy body. Choline for brain health: Abundant in eggs, choline is a nutrient essential for brain health. It aids in the production of acetylcholine, a neurotransmitter involved in various cognitive functions. Particularly important during pregnancy, choline supports fetal brain development, emphasizing the holistic benefits of incorporating eggs into the diet. Heart-healthy fats: Abundant in eggs, choline is a nutrient essential for brain health. It aids in the production of acetylcholine, a neurotransmitter involved in various cognitive functions. Particularly important during pregnancy, choline supports fetal brain development, emphasizing the holistic benefits of incorporating eggs into the diet. Guardian of eye health: Lutein and zeaxanthin, powerful antioxidants found in eggs, play a pivotal role in maintaining eye health. These compounds protect the eyes from harmful light waves, reducing the risk of age-related macular degeneration and cataracts. Eggs emerge as a natural shield for vision.

# 'आई कुठे काय करते' फेम अभिषेक देशमुख या बॉलिवूड अभिनेत्याबरोबर करणार स्क्रीन शेअर



**टि**प्स छोट्या पडद्यावरील 'आई कुठे काय करते' ही लोकप्रिय मालिका आहे. या मालिकेतील कलाकारांवरही प्रेक्षक भरभरून प्रेम करतात. अरुंधतीबरोबरच देशमुख कुटुंबही चाहत्यांना आपलंसं वाटतं. या मालिकेत यश हे पात्र साकारून अभिनेता अभिषेक देशमुख घराघरात पोहोचला. 'आई कुठे काय करते' मालिकेमुळे अभिषेकला खऱ्या अर्थाने प्रसिद्धी मिळाली. अनेक मालिकांमध्ये काम करून प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या अभिषेकच्या हाती आता एक मोठा सिनेमा लागला आहे. अभिषेक देशमुख लवकरच मराठी सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'आईच्या गावात मराठीत बोल' या सिनेमात अभिषेकची वर्णी लागली आहे. नुकताच या सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. यामध्ये अभिषेकची झलक पाहायला मिळाली आहे. 'आईच्या गावात मराठीत बोल' सिनेमात अभिषेक महत्त्वाची भूमिका साकारताना दिसणार आहे.

# मधुराणीनं सांगितला 'आई कुठे काय करते' मधील 'अंगाई'चा किस्सा



**स्टा**र प्रवाह वाहिनीवरील लोकप्रिय मालिका आई कुठे काय करते ने सुरूवातीपासून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविले आहे. या मालिकेतील मुख्य भूमिका आई म्हणजेच अरुंधतीची भूमिका मधुराणी प्रभुलकर हिने साकारली आहे. या भूमिकेतून ती घराघरात पोहचली आहे. मधुराणी सोशल मीडियावर सक्रीय असून ती या माध्यमातून चाहत्यांना अपडेट देत असते. दरम्यान आता तिने मालिकेतील एक किस्सा शेअर केला आहे. मधुराणी प्रभुलकर हिने इंस्टाग्रामवर आई कुठे काय करते मालिकेतील अंगाई गातानाचा व्हिडीओ शेअर केला आहे आणि लिहिले की, डेली सोप म्हणजे जवळपास रोजच शूटिंग. आणि त्यात एखादा दिवस म्हणजे परीक्षा असते. मला या गाण्याचं शूट करायचं होतं त्यादिवशी प्रचंड मायग्रेनचा त्रास होत होता. पण काम करणं प्राप्त होतं.

# अभिनेत्री स्पृहा जोशीने सांगितले पुढील 'पाच वर्षांचे प्लॅन्स'



**म**राठी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी छाप पाडणाऱ्या प्रसिद्ध अभिनेत्री 'स्पृहा जोशी' नेहमीच आपल्या कलागुणांमुळे प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत असते. मराठी नाटक, मालिका आणि चित्रपट यामध्ये स्पृहाने साकारलेल्या विलक्षण भूमिका नेहमीच प्रेक्षकांच्या लक्षात राहिल्या आहे. 'उंच माझा झोका'मध्ये रमाबाई रानडेंची स्पृहाने साकारलेली भूमिका प्रेक्षकांच्या विशेष लक्षात राहिली आहे.

स्पृहा जोशी नेहमीच सोशल मीडियावर आपल्या लाइफचे अपडेट सोशल मीडियावर शेअर करत असते अशात नुकतेच स्पृहाने एक ट्रेंडिग व्हिडीओ केला आहे. ज्यामधून पुढील पाच वर्षांचे तिचे प्लॅन्स काय असणार आहेत? हे सांगण्यात आलं आहे. पुढील पाच वर्षांसाठी माझे प्लॅन्स... स्पृहाने शेअर केला आहे. या विडिओमध्ये तिने आपल्या प्लॅन्सबाबत सांगितले आहे. तिच्या या व्हिडीओवर चाहत्यांनी भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत. तू खूप सुंदर दिसतेस, तू माझी क्रश आहेस अशा अनेक प्रतिक्रिया स्पृहाच्या व्हिडीओवर आल्या आहेत. दरम्यान, स्पृहाने नुकतंच आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर साडी परिधान केल्याचे काही फोटो शेअर असून, त्यात ती खूपच ग्लॅमरस आणि सुंदर दिसत आहे. स्पृहा या फोटोवर चाहते लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत आहेत.

# पाळणा, फुलांची सजावट अन्; घरीच साध्या पद्धतीने सई लोकूरच्या लेकीचा नामकरण सोहळा पार पडला..

**स्टा**र छोट्या पडद्यावरील 'बिग बॉस मराठी' या लोकप्रिय कार्यक्रमातून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री म्हणजे सई लोकूर. या कार्यक्रमातून सई चांगलीच प्रसिद्धीझोतात आली. गेल्या अनेक दिवसांपासुन सईचे प्रेग्नंसी फोटोशूट चांगलेच चर्चेत होते.अशातच तिने नुकतीच सोशल मीडियावर आई झाल्याची बातमी सर्वांबरोबर शेअर केली होती. १७ डिसेंबर रोजी तिला कन्यारत्न प्राप्त झाले होते. आई झाल्याची गुडन्यूज सांगत तिने सोशल मीडियावर एक खास पोस्टही शेअर केली होती. सईने शेअर केलेल्या या पोस्टमध्ये असे म्हटले होते की, आमच्या बाळाच्या येण्याची बातमी सांगताना आम्हाला खूप आनंद होत आहे. आई व बाळ दोघंही सुखरुप आहे. सगळ्यांच्या प्रेमासाठी व शुभेच्छांसाठी खूप धन्यवाद. अभिनेत्री सोशल मीडियावर चांगलीच सक्रिय असते. सोशल मीडियाद्वारे ती तिच्या दैनंदिन घटना शेअर करत असते. नुकतीच सईने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर दोन स्टोरी पोस्ट शेअर करत तिच्या आईपणाविषयी संमिश्र भावना व्यक्त केल्या होत्या. यात खूप तक्रारी आहेत, पण तरीही काहीही तक्रार नाही, मी माज्या छोट्या परीसाठी हे सर्व आनंदाने स्वीकारत आहे. असं म्हटलं होतं. अशातच अभिनेत्रीच्या घरी तिच्या लाडक्या लेकीचा बारसाही पार पडला आहे.

# 'या वर्षात काही माणसं कायमची निघून गेली...', कुशल बद्रिकेची भावुक पोस्ट



**अ**योध्येमध्ये कुशल बद्रिके हा मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेता आहे. 'चला हवा येऊ द्या' शोमधून घराघरात पोहोचलेला हा अभिनेता त्याच्या कुशल विनोदीबुद्धीने प्रेक्षकांना खळखळवून हसवतो. कुशल सोशल मीडियावरही प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. नवीन प्रोजेक्टबाबत कुशल पोस्टद्वारे चाहत्यांना माहिती देत असतो. त्याबरोबर वैयक्तिक जीवनातील अनेक अपडेट्सही तो शेअर करत असतो. नुकतंच कुशलने केलेली एक पोस्ट चर्चेत आली आहे. कुशलने २०२३ वर्षाबाबत एक पोस्ट लिहिली आहे.

या पोस्टमध्ये त्याने २०२३ चा अनुभव शेअर केला आहे. 'ह्या सरत्या वर्षाने जाताना बऱ्याच गोष्टी सोबत नेल्या. काही माणसं मनात घरं करुन कायमची निघून गेली, त्या रिकाम्या घरांच्या जागा आता कधीच भरुन काढता येणार नाहीत,' असं म्हणत कुशलने भावुक पोस्ट शेअर केली आहे. पुढे कुशल म्हणतो, 'दरवर्षीप्रमाणे हे वर्ष सुद्धा' व्याजाचा हप्ता जावा तसा माज्यातला थोडा "innocence" घेऊन गेलंच. मी invest केलेल्या FD प्रमाणेच माज्यातही "maturity" आली नाही, ती नाहीच! बहुतेक कुठे kavest करावं आणि कुठे "invest व्हावं" हे मला खरंच कळत नाही. मित्रांनी सांगितलंय नवीन वर्षात जाताना कोणत्याच emotionsचं baggage सोबत घेऊन जाऊ नकोस, म्हणून माज्यातल्या मलाच थोडा मागे ठेऊन निघालोय.

## HEALTH AND SPORTS

### INDIA PENALISED FOR SLOW OVER-RATE IN CENTURION TEST, LOSE TWO CRUCIAL WTC POINTS



**NEW DELHI :** The International Cricket Council on Friday announced that Rohit Sharma-led India has been penalised for maintaining a slow over-rate in the first test match against South Africa. This made Team India lose two crucial points ahead of the ICC World Test Championship. "India have been fined 10 per cent of their match fee and penalised two ICC World Test Championship points for maintaining a slow over-rate against South Africa in the first Test in Centurion," ICC said in an official statement. The Rohit-led Indian team is also charged 10 per cent of their match fees for bowling two overs short of the target. Chris Broad of the Emirates ICC Elite Panel of Match Referees imposed the sanction after India was ruled to be two overs short of the target after time allowances were taken into consideration. "In accordance with Article 2.22 of the ICC Code of Conduct for Players and Player Support Personnel, which relates to minimum over-rate offences, players are fined five per cent of their match fee for every over their side fails to bowl in the allotted time," a statement from ICC further read. According to Article 16.11.2 of the ICC WTC playing conditions. a team is penalised one point for each over short. Team India has lost two points ahead of the WTC's points table. "India captain Rohit Sharma pled guilty to the offence and accepted the proposed sanction, so there was no need for a formal hearing. On-field umpires Paul Reiffel and Langton Rusere, third umpire Ahsan Raza and fourth umpire Stephen Harris levelled the charge," it further read. Following the Test defeat, India dropped to fifth place with 16 points from three Tests and a points percentage of 44.44.

### JADEJA REGAINS FITNESS, LIKELY TO FEATURE IN INDIA XI FOR 2ND TEST VS SOUTH AFRICA BUT NOT IN PLACE OF ASHWIN



**NEW DELHI :** Amid all the disappointments of a harrowing loss by an innings and 32 runs against South Africa in the Boxing Day Test and the news day after of losing two more WTC points due to slow over rate, there is some silver lining for Team India in the form of Ravindra Jadeja. The star all-rounder, who missed the series opener in Centurion due to an upper back spasm, felt on the morning of Day 1 of the Test match, has started to train and is likely to be available for selection for the New Year's Test in Cape Town. Jadeja was always the preferred choice at No.7 ahead of R Ashwin mainly due to his superior batting skills in overseas conditions but India had no option but to go with their premier spinner in the first Test. Ashwin did fairly well with the ball, picking 1 for 41 in his 19 overs in unfavourable conditions for spinners but where India felt Jadeja's absence was with the bat. The left-hander would perhaps have done a similar hold-up job with the ball but with the bat, he was better equipped to handle the pace and bounce of the South African fast bowlers. As per news agency PTI, Jadeja was a part of the warm-up session before the proceedings started in the middle on Day 3. The all-rounder didn't look in any sort of discomfort as he ran multiple 30 to 40-metre short strides during the morning session. But the most reassuring aspect was his bowling during the lunch break on the third day. Along with reserve pacer Mukesh Kumar, Jadeja, for close to 20 minutes, bowled on a practice track and was keenly watched by the team's strength and conditioning coach, Rajnikant. He was mainly doing spot bowling although he has a two-step run-up. He was hitting the spot consistently and was also seen getting to turn a few in the process. The best part was that he didn't look gingerly at all during the short session when he was bowling.

### AVESH KHAN ADDED TO INDIA'S SQUAD AHEAD OF FINAL TEST CLASH



**NEW DELHI :** After facing an embarrassing defeat against South Africa in the first Test match, Team India decided on Friday to add speedster Avesh Khan to the squad to strengthen their pace bowling attack ahead of the second and final Test match in South Africa. India lost the first test match by 32 runs against South Africa which ended in three days. Avesh Khan was named as the replacement player for the star Indian pacer Mohammed Shami who is battling with an injury and has not received clearance from BCCI's medical team. "The Men's Selection Committee has named Mr Avesh Khan as a replacement for Mr Mohd. Shami for the second Test against South Africa to be played from 3rd-7th January 2024 in Cape Town," the board said in a release. The 27-year-old Avesh was a part of India's playing XI during the three ODIs against South Africa. He bagged six wickets back then in the series. Currently, he is representing India A in the four-day match against South Africa A at Benoni, where he returned 23.3-5-54-5 to help bowl out the hosts for 263 in the first innings. India captain Rohit Sharma lamented the poor support given by other bowlers to pace spearhead Jasprit Bumrah after the visitors suffered one of their worst defeats in South Africa. India played the first test with four pacers Jasprit Bumrah, Mohammed Siraj, Prasidh Krishna and Shardul Thakur and with one spinner Ravichandran Ashwin in the mix. "This was not a 400-run wicket and we gave too many runs. We sprayed the ball all around, but it happened. One can't depend on one particular bowler (Bumrah), the other three pacers also needed to perform their roles, we could learn from how South Africa bowled," Rohit told the media after the match.

### NUTRITION FOR STRESS RELIEF : FOODS TO NATURALLY LOWER YOUR CORTISOL LEVELS



Uncontrolled stress levels not only interrupt with daily functioning and productivity but also impact long-term health, putting one at risk of heart disease, diabetes and mental health conditions like anxiety and depression. While some amount of stress is important to function well, in excess, it can damage body functions and lower immunity. Cortisol is an important hormone that regulates your body's stress response, blood pressure, blood sugar and also your sleep-wake cycle. Too much stress can lead to excess cortisol production which can cause a range of health issues. Creating a routine and structure can help manage emotions and keep stress at bay, lowering cortisol. There are also certain foods that can help bring down stress hormones, boosting well-being and moods. FOODS TO LOWER CORTISOL Here are some nutrients and their food sources as per Kapoor that may help regulate cortisol levels:
1. Vitamin C: A bowl of juicy and delicious citrus fruits loaded with Vitamin C like strawberries, bell peppers, and broccoli can lower cortisol levels and relax your mind and body. Make sure to start your day with these nutrition-filled foods.
2. Omega-3 fatty acids: These important nutrients can ease mental stress considerably by soothing brain and central nervous system. It is present in fatty fish (salmon, mackerel), flaxseeds, chia seeds, and walnuts.
3. Magnesium: High levels of physical or mental stress can lower magnesium levels in the body. Magnesium is an important mineral to manage stress response and cortisol levels. One must consume magnesium-rich foods such as spinach, almonds, cashews, and whole grains.
4. Zinc: It is effective in reducing symptoms of anxiety and depression and must be consumed regularly if you have chronic stress issues. It is found in oysters, beef, pumpkin seeds, and chickpeas.

### 5 LOW-CALORIE MUNCHIES TO SNACK ON FOR A HEALTHY CELEBRATION

With the festive season spanning several months, this prolonged period of increased sugar, fat, and junk food consumption can potentially worsen symptoms of chronic diseases and impact overall health. However, tweaking ingredients of your festive delights can go a long way in cutting calories and avoiding health issues. 1. Dates and nut balls : A combination of dates, nuts and a hint of natural sweetener like stevia or monk fruit is an amazing and guilt-free option for those with sweet tooth. These bite-sized delights pack a punch of energy and festive flavour without the added sugars that can contribute to unwanted calories.
2. Spiced roasted chickpeas : Spice up your festive snacking with roasted chickpeas. You can also add a blend of festive spices like cinnamon, cumin, and a pinch of cayenne in your delightful snack for that extra kick. Roasting them to perfection creates a crunchy, satisfying snack that is not only low in calories but also rich in protein and fibre.
3. Greek yogurt parfait : Transform your dessert cravings into a healthy feast by whipping up a Greek yogurt parfait. Layer low-fat Greek yogurt with fresh berries, a drizzle of honey, and a sprinkle of granola for a delightful treat. This combination provides a balance of protein, probiotics, and antioxidants, making it a guilt-free choice for satisfying your sweet tooth.
4. Vegetable crudité with hummus : Elevate your snack game with a colourful platter of vegetable crudité paired with a homemade hummus. I would recommend including an assortment of colourful veggies like carrots, cucumbers, and bell peppers. The fibre-rich veggies combined with the protein-packed hummus make for a satisfying and low-calorie option for festive munching.
5. Baked apple chips : Embrace the natural sweetness of apples by baking them into crispy chips. I would suggest slicing apples thinly, sprinkling them with a dash of cinnamon, and baking until golden brown. These baked apple chips offer a satisfying crunch and a burst of seasonal flavour without the excess calories found in traditional festive treats.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

# युनिटी मॉलमुळे उलवे व्यापारी केंद्र

■पनवेल। प्रतिनिधी,



राज्यातील पहिला युनिटी मॉल नवी मुंबईतील उलवे वसाहतीमधील सेक्टर १२ येथे उभारला जात असल्याने प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळानजीकच्या उलवे परिसराला भविष्यातील सूक्ष्म, मध्यम व लघु उद्योगांचे व्यापारी केंद्र अशी ओळख मिळणार आहे. सिडको महामंडळ सहा मजली युनिटी मॉल बांधण्यासाठी १४१ कोटी रुपये खर्च करत असून हे व्यापारी संकुल बांधण्यासाठीचा सल्लागार नेमणे व बांधकामाबाबतची निविदा प्रक्रियेला सिडकोने सुरुवात केली आहे. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हस्तकलेत प्रावीण्य मिळविलेल्या कारागीर, वीणकर तसेच महिला बचत गटाच्या उद्योगांना देशभरात युनिटी मॉल उभारून या माध्यमातून राज्यातील व जिल्ह्यातील उत्पादनाला नवे व्यासपीठ देण्याची घोषणा अर्थसंकल्पामधील घोषणेमध्ये केली होती. त्यानुसार राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना व्यापाराची संधी देणाऱ्या राज्यातील पहिल्या युनिटी मॉलची उभारणी नवी मुंबईतील उलवे येथे केली जात आहे. संबंधित मॉल उलवे परिसराचे मुख्य आकर्षण असणार आहे. या मॉलची इमारत वापरण्यायोग्य आणि आकर्षक असावी यासाठी बांधकामाच्या नियोजनासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू आहे.

देशाच्या सर्वच राज्यांतील जिल्हानिहाय एक उत्पादनाला राष्ट्रीय ओळख मिळावी यासाठी अर्थमंत्री युनिटी मॉलच्या माध्यमांतून प्रयत्न करत आहेत. यामुळे स्थानिकांना रोजगाराची संधी मिळेल. योजनेत समाविष्ट झालेल्या उद्योगांचे वर्गीकरण करून सरकार अशा उद्योगांना अनुदान देईल. यामुळे स्थानिक उत्पादनांचे ब्रँडिंग होईल. स्थानिक कौशल्याला व उत्पादकांना संधी मिळून त्यांना युनिटी मॉलमध्ये व्यासपीठ मिळेल. या युनिटी मॉलमध्ये व्यापारी गाळ्यांसोबत हॉटेल, मल्टीप्लेक्स आणि सभागृहाची सोय असेल.

**नव्या वर्षात प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून काही मिनिटांवर असलेला हा युनिटी मॉल पाहण्यासाठी परदेशी पाहुण्यांना आमंत्रित केले जाणार आहे. देशातील उत्पादन व्यवस्था पाहणे सुलभ होणार आहे. पुढील वर्षी प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मालवाहू विमानाचे उड्डाण होणे अपेक्षित असल्याने प्रवासी वाहतूक सुरू होईपर्यंत उलवे येथील युनिटी मॉलच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याचे सिडको मंडळाचे उद्दिष्ट आहे.

# पालिकेचा आपला दवाखाना कंटेनरमध्ये; जागा आणि डॉक्टरांची अडचण कायम

■वसई। प्रतिनिधी,



राज्य शासनाने दिलेल्या आपला दवाखान्याचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी वसई विरार महापालिकेने कंबर कसली आहे. जागा आणि डॉक्टरांची अडचण असली तरी अधिकाअधिक दवाखाने सुरू करण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे. यासाठी पालिकेने दहा कंटेनर आणले आहेत. जानेवारी महिन्यापर्यंत २२ आपला दवाखाना सुरू करण्याचे पालिकेचे प्रयत्न आहेत. वसई विरार महापालिकेकडून २ रुग्णालये, ३ माता बाल संगोपन केंद्र, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व ३ दवाखाने कार्यरत असून यातून नागरिकांना आरोग्य सेवा पुरवली जात आहे. सर्वसामान्य रुग्णांना लहान मोठ्या आजारांचे वेळीच निदान व्हावे आणि घराजवळ मोफत उपचार व्हावेत या उद्देशाने राज्य शासनाने बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ही संकल्पना आणली आहे.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्यातील ३१७ तालुक्यांच्या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरू करण्यात आला. यानंतर राज्यातील सर्वच महापालिकांना आणखी आपला दवाखाना सुरू करण्याचे वेगवेगळे उद्दीष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी वसई विरार महापालिकेला ५५ आपला दवाखाना सुरू करण्यास सांगण्यात आले आहे. पालिकेने आतापर्यंत ८ ठिकाणी आपला दवाखाना सुरू केलेला आहे. उर्वरित आपला दवाखाना सुरू करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहे. आपला दवाखाना सुरू करण्यासाठी जागेची अडचण होती. त्यासाठी पालिकेने खासगी जागा घेण्यासाठी जाहिरात दिली होती. त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. यासाठी पालिकेने कंटेनरमध्ये दवाखाना सुरू करण्याचे ठरवले. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १० कंटेनर आणण्यात आले आहे. या १० कंटेनरमध्ये दहा आपला दवाखाना सुरू केले जाणार आहेत. विरारच्या मनवेलपाडा येथे कंटेनर मधील आपला दवाखाना सुरू केला जाणार आहे. सध्या आमच्याकडे ८ आपला दवाखाना सुरू आहेत. ४ दवाखान्यांचे काम प्रगतीपथावर आहे. कंटेनरमधील १० आपला दवाखाना लगेच सुरू करण्यात येतील. त्यामुळे जानेवारी महिन्यात २२ आपला दवाखाना सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त (आरोग्य) विनोद डवले यांनी दिली.


# महानगरपालिका लागली कामाला; ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर ठेवणार कडक नजर



■मुंबई। प्रतिनिधी,

नववर्ष स्वागतासाठी अनेकांनी हॉटेल, रिसॉर्ट, चायनीज कॉर्नर, फॉर्म हाऊस या ठिकाणी बेत आखले आहेत. या दिवशी उत्साह शिगेला पोहोचत असल्याने अनेकदा ग्राहकांना निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ विकले जातात. त्यामुळे नूतन वर्षाच्या स्वागत सोहळ्या ग्राहकांच्या आरोग्याची खेळणाऱ्यांवर अन्न उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर असणार आहे. वाशी रेल्वे स्थानकामध्ये शौचालयामध्ये पाणीपुरीचे सामान ठेवल्याचा प्रकार यापूर्वी घडला होता. त्याचप्रमाणे ऐरोलीमध्ये शौचालयातील पाण्याचा वापर पाणीपुरीसाठी करण्यात आला होता; तर पिण्यास अयोग्य पाणी खाद्यपदार्थांसाठी वापरण्यात येते. अशा घटना वारंवार घडत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. थर्टी फस्टच्या काळातही अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे अन्न बनवण्यात येते. हॉटेलमध्ये ग्राहकांची संख्या वाढत असल्यामुळे अन्न अर्धवट शिजलेल्या अवस्थेत देण्यात येते. त्यामुळे अशा निकृष्ट अन्नविक्रेत्यांवर कारवाई होणार असल्याची माहिती कोकण विभाग सहआयुक्त अन्न औषध प्रशासन सुरेश देशमुख यांनी दिली आहे. अन्न औषध प्रशासनाकडून दहा दिवसांपूर्वीच हॉटेल व्यावसायिकांना सूचना केल्या आहेत. हॉटेलमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींकडून स्वच्छतेबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच कोणी नियमांचे उल्लंघन केल्यावर त्यांच्यावर कारवाई होणार आहे.

# बाजारात 'गोल्डन' सीताफळे दाखल, मागणीत वाढ



■नवी मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई कृषी उत्पन्न बाजारात सीताफळाची अवाक वाढली असून गोल्डन नामक जातीच्या सीताफळाच्या मागणीतही वाढ होत आहे. मोसमी फळ असलेल्या सीताफळाची जानेवारीपर्यंत अशीच आवक राहील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सीताफळात गोल्डन सीताफळाची आवक सुरू झाली आहे. रोज अंदाजे ४५० क्विंटलची आवक होत असून मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्याची माहिती फळ व्यापारी राहुल डेरे यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील बार्शीमधून सर्वाधिक आवक होत आहे. गोल्डन, सरस्वती या जातींची सीताफळे येत आहेत. ठोक बाजारात ३० ते ४० रुपये किलो तर किरकोळ बाजारात शंभर रुपयांच्या आसपास प्रतिकिलो दर आहेत.

# डोंबिवलीत फडके रोडवरील सराफाला ११ लाखाला फसविले

■डोंबिवली। प्रतिनिधी,



येथील फडके रोडवरील एका सराफाच्या दुकानात दागिने खरेदी करण्याच्या उद्देशाने गुरुवारी दुपारी तीन वाजता तीन महिला ग्राहक म्हणून आल्या. त्यांनी जवळील बनावट सोन्याचे दागिने खरे भासवून त्या बदल्यात दुकानातील १० लाख ७१ हजार रूपयांचे खरे दागिने घेऊन सराफाची फसवणूक केली आहे. खरेदीदार महिला खरे दागिने घेऊन गेल्यानंतर दुकानदाराला संशय आला. त्याने तातडीने महिलांकडून ताब्यात घेतलेल्या दागिन्यांची तपासणी केली. त्यावेळी ते बनावट असल्याचे आढळले. पंकज महेंद्र शंकळेशा (३८) असे फसवणूक झालेल्या सराफाचे नाव आहे. त्यांचे डोंबिवली पूर्वेतील फडके रोडवरील साई आर्केड सोसायटीत गणपती मंदिराच्या बाजुला सोन्याची पेढी आहे. त्यांचे कल्याण येथेही शिवाजी चौक भागात जवाहिऱ्याचे दुकान आहे. पोलिसांनी सांगितले, गुरूवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास तीन अनोळखी महिला ग्राहक म्हणून साई आर्केडमधील जवाहिर पंकज शंकळेशा यांच्या दुकानात आल्या. त्यांनी आपल्याकडे काही दागिने आहेत. ते दागिने देऊन त्या बदल्यात अन्य कलाकुसरीचे दागिने खरेदी करायचे आहेत असे जवाहिर पंकज आणि त्यांच्या मंचकासमोरील कर्मचाऱ्यांना सांगितले. दागिने खरेदी करत असताना या तीन महिला भुरट्या असल्याने त्या हालचलाखी करत कर्मचाऱ्यांना बोलण्यात गुंतवून ठेऊन दागिन्यांची पारख करत होत्या.

# मीरा -भाईंदरमध्ये मुख्यमंत्र्यांची मोर्चेबांधणी, भाजपमध्ये अस्वस्थता

■ठाणे। प्रतिनिधी,




ठाणे लोकसभेचा महत्वाचा भाग असलेल्या मीरा-भाईंदर शहरांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील सत्ताबदलानंतर लक्ष केंद्रीत केल्याने या भागातील भाजप नेते कमालीचे सावध झाले आहेत. जैन, गुजराती समाजाचा मोठा भरणा असलेली ही शहरे अलिकडच्या काळात भाजपचा बालेकिल्ला बनली आहेत. राज्यात युतीचे सरकार असताना येथील महापालिका निवडणुकीत भाजप आणि पुर्वीची एकसंघ शिवसेना एकमेकांविरोधात लढले. शिवसेनेचे या भागातील आमदार प्रताप सरनाईक यांनी ही शहरे जिंकण्यासाठी जंगजंग पछाडले. मात्र ऐनवेळेस येथील ठराविक समाजातील साधूंनी केलेल्या आवाहनाचा मोठा फटका शिवसेनेला बसला. तेव्हापासून या शहरांवर एकहाती वरचष्मा मिळविण्यासाठी आमदार सरनाईक प्रयत्नशील आहेत. राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनीही या शहरांवर लक्ष केंद्रीत केले असून विद्यमान आमदार गीता जैन आणि सरनाईक या दोघांनाही भरभरुन निधी दिला जात आहे. या दोन्ही आमदारांच्या माध्यमातून मीरा-भाईंदरवर आपल्या पक्षाची पकड कायम ठेवण्याची मुख्यमंत्र्यांची रणनिती भाजपच्या स्थानिक नेत्यांना मात्र अस्वस्थ करु लागली आहे. ठाणे जिल्ह्यातील मीरा भाईंदर शहरातील दोन्ही मतदारसंघावर मुख्यमंत्री एकनाश शिंदे यांनी विशेष लक्ष दिले आहे. प्रताप सरनाईक आणि गीता जैन या दोन्ही आमदारांना भरघोस निधी मंजूर केला जात आहे. गीता जैन या भाजपच्या बंडखोर आमदार. महाविकास आघाडी सरकारच्या काळातच मुख्यमंत्र्यांनी त्यांना आपल्या बाजूने वळविले. राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर जैन या भाजपच्या व्यासपिठावर तसेच वेगवेगळ्या बैठकांना दिसू लागल्या आहेत. असे असले तरी आगामी निवडणुकीत त्या नेमक्या कोणाच्या बाजूने असतील याविषयी अजूनही स्पष्टता नाही. मुख्यमंत्र्यांनी गेल्या वर्षभारत किमान एक डझन वेळा शहरात विविध कार्यक्रमानिमित्ताने भेटी दिल्या आहेत. शहरात पक्ष वाढविण्यासाठी प्रताप सरनाईक यांनी काढलेल्या कंटेनर शाखांना मुख्यमंत्र्यांचा वरदहस्त आहेच. या सगळ्या घडामोडींमुळे आपल्याच बालेकिल्ल्यात भाजप संभ्रमात असल्याचे चित्र आहे.

मीरा भाईंदर शहराचा समावेश हा ठाणे जिल्ह्यात येतो. भाईंदर मतदार संघांचे नेतृत्व भाजप उमेदवाराला पराभूत करून अपक्ष निवडणुन आलेल्या आमदार गीता जैन करत आहेत. तर ओवळा झ माजीवडा मतदार संघ हा मागील तीन निवडणुकीपासून शिवसेनेच्या (आता शिंदे गट ) प्रताप सरनाईक यांच्या ताब्यात आहे.

# कल्याणमध्ये सात लाखाचा गुटखा जप्त; पाच आरोपी फरार

■कल्याण। प्रतिनिधी,




येथील पूर्व भागातील विठ्ठलवाडी भागातील एका बेकायदा चाळीत साठा करून ठेवलेला सात लाख रूपयांचा गुटखा कोळसेवाडी पोलिसांनी छापा टाकून जप्त केला. या बेकायदा साठा प्रकरणातील पाच आरोपी फरार झाले आहेत. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मनीष यादव आहे. त्याच्यासह इसरार अहमद, विनोद गंगवाणी आणि त्यांचे दोन साथीदार छाप्यानंतर फरार झाले आहेत. विठ्ठलवाडी येथील मंजुनाथ बारच्या मागील बाजूस असलेल्या गायकवाड चाळीत बेकायदा गुटख्याचा साठा करण्यात आला आहे. तेथून त्याची विक्री करण्यात येत आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त सचीन गुंजाळ यांना मिळाली होती. त्यांनी ही माहिती कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिरसाठ यांना दिली.

शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी उल्हास जाधव, दिनकर पगारे यांच्या पथकाने गुरूवारी गायकवाड चाळीत छापामारून गुटखा जप्त केला. राज्यात गुटखा विक्रीवर बंदी असताना तस्करांनी हा गुटखा आणून त्याची चोरून परिसरात विक्री सुरू केली होती. डोंबिवली, कल्याण भागातील पान टपरी विक्रेत्यांना हा गुटखा विक्री केला जात असल्याची पोलिसांची माहिती आहे. गुटख्याच्या साठ्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे, अशी माहिती मिळताच या साठा केंद्राकडे नियमित फेऱ्या मारणारे पाच आरोपी फरार झाले आहेत. यादव हा मुख्य आरोपी आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून फरार आरोपींचा शोध सुरू केला आहे. हा गुटखा कुठून आणला. गायकवाड चाळीत त्यांना गुटखा ठेवण्यास जागा कोणी दिली, याचा तपास पोलीस करत आहेत.

# ३० हजार भटक्या श्वानांच्या लसीकरणाचा निर्णय, रेबीजची लस देण्यासाठी पाच दिवसीय विशेष मोहीम



■भाईंदर। प्रतिनिधी,

मीरा भाईंदर शहरात मोकाट फिरत असलेल्या ३० हजार भटक्या श्वानांना रेबीजची लस देण्यासाठी महापालिका पाच दिवसीय विशेष मोहीम हाती घेणार आहे. यामुळे संपूर्ण शहर रेबीज मुक्त होणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे. मीरा भाईंदर शहरात निर्बीजीकरण व लसीकरण न झालेले जवळपास ३० हजारांहून अधिक श्वान मोकाट फिरत आहेत. यामुळे शहरातील श्वानची संख्या झापट्याने वाढत असून श्वानदंशाच्या घटनेत देखील वाढ झाली आहे. मागील वर्षभरातील श्वान दंशाची आकडेवारी पाहता प्रति दिवस २८ जणांना हे श्वान चावा घेत आहेत.यामुळे मोकाट श्वानाची दहशत पसरू लागली आहे. तर याने रेबीजसारख्या गंभीर आजाराचा प्रसार होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे यावर नियंत्रण मिळवण्यासाठी शहरातील मोकाट श्वानाचे रेबीज लसीकरण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यासाठी महापालिकेला जागतिक पशुवैद्यकीय सेवा ( वर्ल्ड वेटरनेटी सर्व्हिसेस ) संस्थेची मदत मिळणार आहे. २६ फेब्रुवारी ते १ मार्च २०२४ पर्यंत असे पाच दिवस हे लसीकरण राबवले जाणार आहे. यासाठी प्रभाग स्तरावर एकूण ७ विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.

# 'लाडली बहन' योजनेच्या अफवेने वाडा टपाल कार्यालयासमोर महिलांच्या रांगा

■वाडा। प्रतिनिधी,



मध्यप्रदेश सरकारने कनिष्ठ आणि मध्यमवर्गीय महिलांसाठी दरमहा एक हजार रुपये सहाय्य देणारी योजना सन २०२३ पासून सुरु केली आहे. अशा प्रकारची योजना महाराष्ट्र सरकारही लवकरच सुरु करणार असल्याची अफवा पसरवली गेल्याने या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील महिला तालुका मुख्यालयी असलेल्या टपाल कार्यालयात खाते उघडण्यासाठी गर्दी करीत आहेत. गेल्या १५ दिवसांपासून येथील टपाल कार्यालयात महिलांच्या रांगा दिसत आहेत. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण योजना अंतर्गत मध्यप्रदेश सरकारने २८ जानेवारी २०२३ रोजी कनिष्ठ आणि मध्यमवर्गीय घरातील महिलांसाठी दरम्यान १००० रुपये अर्थसहाय्य देणारी योजना घोषित केली. व ५ मार्च २०२३ पासून या योजनेचा प्रत्यक्ष लाभ दरमहा या राज्यातील महिलांना मिळू लागला. महिलांचे सक्षमीकरण करणे, त्यांना चांगल्या भविष्याकडे नेणे या उद्देशाने सुरू केलेल्या या योजनेचा लाभ मध्यप्रदेश मधील लाखो महिलांना मिळाल्याने या राज्यात अलिकडेच झालेल्या विधानसभा निवडणुकीत येथील तत्कालीन भाजपा सरकारला पुन्हा चांगले यश मिळाले. महाराष्ट्र राज्यात महिलांसाठी अशाच प्रकारची योजना शिंदे सरकार सुरु करणार असल्याची अफवा वाडा तालुक्यात पसरवली गेल्याने वाडा येथील टपाल कार्यालयात सकाळपासूनच ग्रामीण भागातील महिला खाते उघडण्यासाठी गर्दी करताना दिसत आहेत. खाते उघडण्यासाठी आलेल्या महिलांना खाते उघडण्याचे कारण विचारले असता, महिलांना लवकरच पैसे मिळणार आहेत असे या महिलांकडून सांगितले जात आहेत. इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या खात्यात दोनशे रुपये जमा करुन खाते उघडले जात असल्याने व खातेदारांना क्युआर कार्ड लगेच दिले जात असल्याने ही गर्दी दररोज वाढताना दिसत आहे. १) खाते उघडणे गैर नाही - सध्या ज्या उद्देशाने महिला खाते उघडण्यासाठी टपाल कार्यालयात गर्दी करतात तो उद्देश जरी सद्या त्यांचा सफल झाला नाही तरी या महिलांची खाते इंडिया पोस्ट पेमेंट बँक या भारत सरकारच्या बँकेत उघडली जात असल्याने सद्या राज्य व केंद्र सरकारकडून विविध प्रकारचे येणारे अनुदान व लाभाच्या योजनांचे पैसे याच भारत सरकारच्या बँक खात्यावर जमा होत आहेत.

# टाकाऊ वस्तूंपासून बनवले देखणे शौचालय, राज्यातील पहिलाच प्रयोग



■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबई महापालिका स्वच्छतेच्या बाबतीत विविध नावीन्यपूर्ण संकल्पना राबवत राज्यभरात स्वच्छतेबाबत व सुभोभीकरणात आघाडीवर असते. टाकाऊतून टिकाऊ अशी अभिनव संकल्पना राबवत आकांक्षी शौचालय कोपरखैरणे, सेक्टर १४ येथे उभारण्यात आले आहे. या आकांक्षी शौचालयाचे लोकार्पण नुकतेच करण्यात आले. राज्यातील हा पहिलाच प्रयोग ठरला आहे. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनात कचऱ्याचा पुनर्वापर करून कोपरखैरणे येथे आकांक्षी शौचालय उभारताना पालिकेने ४२६ चौ.मी. क्षेत्रफळाच्या पुनर्प्रक्रियाकृत प्लास्टिक शीटचा वापर केला आहे. तसेच ५.३० मेट्रिक टन एकल वापर प्लास्टिकचा उपयोग करण्यात आला आहे. विशेष म्हणजे शौचालयाची सजावट ११ हजार ७०० हून अधिक प्लास्टिक बाटल्यांच्या वापरातून केली आहे. तसेच शौचालयातील विविध सांकेतिक चिन्हे ही ३५ हजार २०० हून अधिक बाटल्यांच्या झाकणांचा अत्यंत कलात्मक पद्धतीने वापर करुन आकर्षक रूप देण्यात आले आहे. पालिकेने शौचालयांच्या सजावटीसाठी संगणकाच्या ८५ की-बोर्डचा उपयोग केला आहे आहे.

# धावत्या लोकलमधून उडी घेत १५ वर्षीय मुलाने संपवले जीवन; वाशी खाडीत सापडला मृतदेह



■नवी मुंबई। प्रतिनिधी,

वाशीतील जुहूगावात राहणाऱ्या एका १५ वर्षीय मुलाने धावत्या लोकलमधून वाशी खाडीमध्ये उडी टाकून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. मंगळवारी सायंकाळी हा मुलगा घरातून निघून गेला होता. त्यानंतर बुधवारी सायंकाळी त्याचा मृतदेह वाशी खाडीत सापडल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

या मुलाच्या आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. हा मुलगा आईवडील व भावंडांसह राहात होता. तसेच, तो वाशीतील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत इयत्ता नववीत शिकत होता. मंगळवारी त्याचे आई-वडील कामावर गेले असताना, सायंकाळी तो घरातून बाहेर पडला होता. रात्री उशिरापर्यंत तो घरी न परतल्याने त्याच्या आईवडिलांनी त्याचा सर्वत्र शोध घेऊन वाशी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार वाशी पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला होता. त्यासाठी वाशी पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी केली असता तो रात्री वाशी रेल्वे स्थानकातून लोकलने मानखुर्द येथे गेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर तो मानखुर्द स्थानकात उतरून पुन्हा वाशीच्या दिशेने येत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये निदर्शनास आले. मात्र तो वाशीत उतरताना निदर्शनास आला नव्हता.

यादरम्यान एका मुलाने धावत्या लोकलमधून वाशी खाडीमध्ये उडी मारून आत्महत्या केल्याची माहिती काही प्रवाशांनी रेल्वे पोलिसांना दिली होती. त्यानुसार, वाशी पोलिसांनी त्याचा शोध घेतला असता, बुधवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास या मुलाचा मृतदेह वाशी खाडीमध्ये तरंगताना निदर्शनास आला. त्यानंतर वाशी पोलिसांनी अग्निशमन दलाच्या मदतीने त्याचा मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात पाठवला आहे.

# शिवसेनेच्या बेकायदेशीर कंटेनर शाखांवर कारवाई करण्याकडे अधिकाऱ्यांचा काणाडोळा



■भाईंदरे। प्रतिनिधी,

महिनाभराहून अधिक कालावधी पूर्ण झाल्यानंतरही मीरा भाईंदर मधील बेकायदेशीर शिवसेनेच्या कंटेनर शाखेवर कारवाईची मोहीम पालिकेने हाती घेतलेली नाही. त्यामुळे आगामी दिवसांत शहरात अनधिकृत बांधकामात वाढ होण्याची भीती निर्माण झाली आहे. मीरा भाईंदर शहरात शिवसेना (शिंदे गट) पक्षाकडून रस्त्यावर तसेच पदपथावर भगव्या रंगाचे कंटेनर बसवून त्यांना शाखेचे स्वरूप देण्यात आले आहे. महिना भरापूर्वीच स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांच्या हस्ते याचे उदघाटन करण्यात आले आहे. मात्र शहरातील मुख्य चौकात तसेच पदपथ अडवून या शाखा उघण्यात आल्यामुळे यावर भाजप व राष्ट्रवादी वगळता अन्य विरोधी पक्षांकडून आक्षेप नोंदवाण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे कोणत्याही परवानगी शिवाय या शाखा उघडण्यात आल्या आहे. त्यामुळे यावर कारवाई करण्याची मागणी पालिका आयुक्तांकडे करण्यात आली होती. त्यानुसार या शाखेसह शहरातील अन्य राजकीय पक्षाच्या अनधिकृत कार्यालयावर कारवाई करणार असल्याचे आयुक्त संजय काटकर यांनी जाहीर केले होते. मात्र यास आता महिनाभराचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्याच पक्षाच्या कार्यालयावर कारवाई केल्यानंतर त्रास होण्याची भीती असल्यामुळे अधिकारी याकडे कानाडोळा करत आहेत.

# शीव-पनवेल महामार्गावरील पालिका हद्दीतील पथदीवे बंद, अपघातांची शक्यता

■नवी मुंबई । प्रतिनिधी,



नवी मुंबई शहरात पामबीच मार्ग, ठाणे-बेलापूर मार्ग, एमआयडीसीमधील रस्ते व शीव-पनवेल महामार्ग अशा अनेक मार्गावर दिवाबत्तीसाठी पालिकेने पथदीवे लावले आहेत. शीव-पनवेल महामार्गावरील दिवाबत्तीची सुविधा पालिकेने सततच्या नागरिकांच्या तक्रारींमुळे आपल्याकडे हस्तातंरीत करून घेतली व त्यावर जवळजवळ ११ कोटी खचार्तून एलईडी दिवे लावले.

परंतू मागील काही दिवसांपासून वाशी उड्डाणपूल ते वाशी टोलनाका या मार्गावर पथदीवे बंद असून अपघातांची शक्यता वाढली आहे. तत्कालिन आयुक्त डॉ. रामास्वामींपासून पालिका हद्दीतून जाणाऱ्या महामार्गांवरील दिवाबत्ती सातत्याने बंद असल्यामुळे व्यवस्था रस्ते विकास महामंडळाची व लाखोल्या मात्र खाव्या लागत होत्या. तत्कालिन आयुक्त अभिजीत बांगर यांच्या कार्यकाळात महामार्गावरील वाशी ते बेलापूरपर्यंतची दिवाबत्ती पालिकेकडे हस्तातंरीत करण्यात आली आहे. पालिकेने दिवाबत्तीसाठी करोडोंचा खर्च केला आहे. परंतू अनेकवेळा महामार्गावरील पथदीवे उघड-बंद राहत असल्याचे चित्र पाहायला मिळते. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना अंधारामुळे रस्त्याचा अंदाज न आल्याने अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. पालिका हद्दीतील बेलापूर ते वाशी या मार्गावर दिवाबत्तीबाबत पाहणी करण्यात येईल.

तसेच तांत्रिक अडचण असल्यास तात्काळ सुधारणा करण्यात येईल. प्रवाशांना अडचण येणार नाही, याबाबत खबरदारी घेतली जाईल, असे विद्युत विभागाचे अभियंता मिलिंद पवार यांनी म्हटले आहे. वाशी रेल्वेस्टेशनकडून मुंबईकडे जाताना या उड्डाणपुलावर तसेच वाशी उड्डाणपुल ते टोलनाका या परिसरात वीजबत्ती बंद असते. त्यामुळे संबंधित शासकीय आस्थापनांनी याबाबत खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे, असे वाहनचालक दिनेश गोरे यांनी म्हटले आहे.

